# कमर जलालाबादी - भाग १



कमर जलालाबादी हे एक गीतकार होते. त्यांनी कित्येक संगीत दिग्दर्शकांसाठी एकूण १६६ हिंदी चित्रपटांकरिता जवळ जवळ ७०० गाणी लिहिली. एवढी असामान्य प्रतिभा असूनही त्यांनी कधीही आपला मोठेपणा दाखवला नाही. प्रसिध्दी, भपकेबाजी किंवा सिनेमासारख्या लंब्याचवड्या गोष्टी यांपासून ते दूरच राहिले. ते अतिशय नम्र होते आणि ते स्वत:बद्दल क्वचितच बोलत. त्यांचे खरे नाव ओमप्रकाश भंडारी असे होते आणि गीतकार म्हणून ते कमर जलालाबादी हे टोपणनाव लावीत असत. इंग्रजीमध्ये जलालाबादी व भंडारी लिहिल्यास त्यांच्या स्पेलिंगमध्ये आय् हे अक्षर शेवटी येते. मराठीत आय् म्हणजे मी म्हणजेच अहंपणा. तो त्यांच्याकडे कधीही नव्हता ! तो नेहमीच शेवटी येत असे. स्वभावत:च ते असेच होते. ते सदैव आपल्या गीतांबद्दलच बोलत, पण स्वत:बद्दल क्वचितच बोलत. अशा या गीतकाराचे ९ जानेवारी २००३ रोजी निधन झाले. शेवटपर्यंत ते, त्यांची मुलगी सुभाषिनी आणि तिचे कुटुंबीय यांच्यासमवेत मुंबईतील अंधेरी येथे राहत असत. त्यांचा नशीबावर मोठा विश्वास होता. आपल्या दैवात जे असेल त्याप्रमाणेच घडते असेच ते धरून चालायचे.

अफगाणिस्तानच्या पूर्व भागातील जलालाबाद येथे २८ फेब्रुवारी १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील राजकारणात सक्रिय सहभाग घेत असत. त्यामुळे तरुणपणी ओमप्रकाश यांनाही राजकीय गोष्टींत रस होता. ह्या सर्व उलाढाली सुरू असतानाच त्यांना काव्यरचनेत स्वारस्य वाटू लागले. (त्यांच्या मते हाही एक दैवाचाच भाग असावा !) त्यांना उर्दू लिहिता वाचता येत होतेच, शिवाय लाहोरमध्ये असताना त्यांनी असेच काही हिंदी चित्रपट पाहिले. आणि ते पाहिल्यावर त्यांना काहीतरी जाणीव झाली. आपणही अशीच काही गाणी लिहू शकतो हे त्यांना प्रकर्षाने जाणवले आणि तेही गीते

लिहू लागले. तेव्हा त्यांच्या एका हितचिंतकाला असे वाटले की गीतकार म्हणून ओमप्रकाश हे नाव तितकेसे आकर्ष्क वाटत नाही. तेव्हा या युवा गीतकाराने आपले नाव 'कमर' असे बदलून घेतले. कमरचा अर्थ चंद्र असा आहे.

गीतकार कमर यांनी जलालाबादहून लाहोर येथे काही काम मिळते का हे पाहण्यासाठी जाण्याचं ठरवलं आणि त्यात ते यशस्वीही झाले. तेथील 'प्रताप' या प्रसिध्द नियतकालिकाच्या संपादकाला त्यांनी आपले काही लेखन दाखविले. त्यांना ते खूप आवडले आणि या युवा गीतकाराला त्यांनी लवकरच चांगल्या भरघोस पगाराची नोकरी दिली. लाहोरमध्ये चित्रपट निर्माता पांचोली आणि संगीत दिग्दर्शक गुलाम हैदर यांसारख्या चित्रपटसृष्टीतील दिग्गज जाणकारांच्या सहवासात ते आले आणि त्यांचा फायदाच झाला. १९४२ साली प्रदर्शित झालेल्या 'जमीनदार' या चित्रपटात वरील दोघांमुळे त्यांना चित्रपटसृष्टीत काम करण्याची संधी मिळाली. या चित्रपटांत त्यांना ५ गीते लिहिण्याची संधी मिळाली आणि त्यांपैकी एक म्हणजे 'दुनियामे गरीबोंको आराम नही मिलता' हे होते. ते अतिशय लोकप्रिय झाले. हे गीत बरेच गाजल्यामुळे पुण्याच्या प्रभात कंपनीकडून त्यांच्या चित्रपटांसाठी गीते लिहिण्याकरता त्यांना बोलवण्यात आले. ते लगेच पुण्याला गेले आणि त्यांनी प्रभातच्या ४ चित्रपटांसाठी गीते लिहिली.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com